Interdisciplinary National Conference
On
Environment and Social Development
1st December, 2018

# Conference Proceedings

Editors

*Dr. Sanjay Dudhe*
*Dr. Varsha Vaidya*

Organised By:-
**Shri Sachhidanand Shikshan Sanstha, Nagpur**
**Department of Humanities and Social Sciences**
**Taywade College, Mahadula, Koradi, Nagpur**

Scanned with OKEN Scanner

# Interdisciplinary National Conference
# On
# Environment and Social Development

**1st December, 2018**

***Organized by***

Shri Sachhidanand Shikshan Sanstha, Nagpur

Department of Humanities and Social Sciences

Taywade College, Mahadula, Koradi

**Editors**

**Dr. Sanjay S.Dudhe**
**Convener**

**Dr.Varsha Vaidya**
**Organizing Secretary**

Scanned with OKEN Scanner

**Chief Patron**
**Dr.Babanrao Taywade**
President
Shri Sachhidanand Shikshan Sanstha,
Nagpur

**Patron**
**Principal**
Dr. S.B.Taywade
Taywade College, Mahadula,Koradi

**Convener**
Dr. Sanjay S.Dudhe
Associate Professor and Head
Department of Sociology

**Organizing Secretary**
Dr.Varsha Vaidya
Associate Professor & Head, Dept of English Taywade College
Mahadula, Koradi

**Organizing Committee**
Dr. D.S.Samarth
Dr.Sharad Daware
Dr. Rajendra Watane

**Members**
*Dr. V.Sheikh, Dr. S.Ghugal, Dr.M.R.Wagh, Dr.Gajanan Polanwar, Dr.A.Bhaik, Dr.Maya Shirkhedkar, Dr.V.Chauhan, Dr.Komal Thakare, Dr.C.Waghmare*

**ISBN:978-81937717-6-1**

**-Publication-**

**Sankalp Publication**
**Vidyanagar Nagpur**
**M-8600848950**

Scanned with OKEN Scanner

## प्रादेशिक कादंबरीतील पर्यावरण जाणीव जागरूकता

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभागप्रमुख
श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय,
मौदा, जि. नागपूर

### प्रादेशिक साहित्य म्हणजे काय?

प्रदेश म्हणजे नैसर्गिक वैशिष्ट्यांनी युक्त असा भूभाग होय. नद्या, पर्वत, वातावरण, भू–पृष्ठ, भाषा खनिजपदार्थ, अरण्ये, अन्नधान्ये यामुळे ही वैशिष्ट्ये प्राप्त होतात. आर्थिक, सांस्कृतिक आणि प्राकृतिक वैशिष्ट्यांनुसार प्रदेश विभागले जातात. या प्रदेशाचे नावीन्यपर्ण सौंदर्य, तेथील लोकसंस्कृती, भाषा, प्रश्न इत्यादी गोष्टींचे दर्शन जेव्हा साहित्यिक आपल्या साहित्यातून घडवतात तेव्हा ते साहित्य प्रादेशिक साहित्य असते. वेब्स्टर म्हणतो की प्रादेशिकता म्हणजे नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणाला महत्त्व देणारी साहित्यिक प्रवृत्ती होय. याचा अर्थ प्रादेशिकतेत निसर्ग व पर्यावरण हेच अत्यंत महत्त्वाचे घटक असतात. ''थोडक्यात– विशिष्ट प्रदेशातील संस्कृती, भाषा, समस्या, निसर्ग व समाजजीवन इत्यादी मूल्यवैशिष्ट्यांचे मूल्यमापन करून त्यावर साहित्यात जोर देण्याची प्रवृत्ती म्हणजे प्रादेशिकता होय''1

### पर्यावरणसंबंधी जाणीव–जागरूकतेचा अर्थ :

आज जंगलतोडीमुळे जमीन झिजून तिची सुपीकता नष्ट होऊ लागली आहे. नियोजनशून्य अफाट वापरामुळे जमीन ओसाड, वाळवंटी व क्षारयुक्त बनत चालली आहे. जंगलाचे क्षेत्र सतत कमी कमी होत जाऊन जमिनीवरची छाया व जैव आच्छादन हळूहळू कमी होत आहे. जमिनीवर साचणारा पालापाचोळ्याचा थर जमिनीत पाणी मुरवण्याची क्षमता ठेवायचा आणि जमिनीच्या पृष्ठभागावरील पाण्याचा वेग रोखण्याला समर्थ असायचा. पण या पालापाचोळ्याचे प्रमाण कमी झाल्याने पाऊस पडूनही पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होते. ''कधी कधी महापुराचे, जलप्रलयाचे भयानक संकट उभे राहते. आता तर 'नेमेचि येतो मग पावसाळा' अनुभवाला 'नेमेचि येतो दुष्काळ, महापूर' असे नवे धडे शिकावे लागत आहेत.''2 पाण्याच्या नियोजनशून्य वापराने पाण्याची टंचाई तर भासत आहेच, शिवाय असलेले जलसाठेही औद्योगिक क्रांतीच्या धुंदीत प्रदूषित करत आहोत. समुद्र म्हणजे कचरा, घाण, सांडपाणी, रासायनिक विषारी अवशेष टाकण्याचे आपले हक्काचे साधन बनले आहे. अशा विषारी अवशेषांच्या संचयाने त्या पाण्याच्या बाष्पीभवनामुळे होणारा पर्जन्यवर्षावही दूषित पाण्याचा होऊ शकतो. ही शक्यता फार वाढली आहे. लोकसंख्यावाढ आणि औद्योगिक क्षेत्रातली बेसुमार वाढ यामुळे संपूर्ण वायुमंडळच प्रदूषित झाले आहे. ओझोन वायूच्या थरांनाही आता उपद्रव होत आहे. ओझोनवायूच्या थरामुळेच सूर्यप्रकाश आपल्याला सुसह्य होऊ शकतो. आता तर ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण, वायुप्रदूषण हेही मानवी जीवनाला संकटात लोटणारे प्रश्न उपस्थित करीत आहेत. या सर्व आपत्तींचा विचार करणे आणि त्यावर उपाययोजना शोधणे व मानवी जीवन सुखी बनवणे असा पर्यावरणसंबंधी जाणीव जागृती याचा अर्थ आहे. निसर्गाचा समतोल बिघडू न देणे म्हणजे पर्यावरणसंबंधी जाणीव जागृती होय.

### प्रादेशिक कादंबरीचे वैशिष्ट्ये :

Scanned with OKEN Scanner

पर्यावरणसंबंधीची जाणीव प्रादेशिक साहित्यातून आणि त्यातही प्रादेशिक कादंबऱ्यातून विशेषत्वाने दिसून येते. कारण लेखक ज्या प्रदेशात जगतो, वाढतो, जी माणसे तो जवळून पाहतो, जिथला निसर्ग तो मनसोक्त उपभोगतो, या संबंध परिसराला तिथल्या रंगगंधासह, त्यातल्या जीवननाट्यासह, त्यातल्या बऱ्यावाईट उभ्या आडव्या, सरळप्रमार्थी प्रेरणा आणि अनुभवासकट जिवंत करण्याची त्या लेखकाची उत्कट धडपड हे प्रादेशिक कादंबरीचे वैशिष्ट्ये होय. म्हणून पर्यावरणाचा विचार करताना प्रादेशिक कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले चिंतन डावलता येत नाही.

**प्रादेशिक कादंबरीकार व त्यांच्या कादंबऱ्या :**

**र.वा. दिघे :**

पाणकळा, सराई, पूर्तता, निसर्गकन्या रानजाई, कार्तिकी, पड रे पाण्या, पावसाचे पाखरू व गानलुब्धा मृगनयना ही र.वा. दिघे यांची कादंबरीसृष्टी आहे. 'पाणकळा' ही मराठी वाङ्मयातील पहिली प्रादेशिक कादंबरी होय. पाणकळा याचा अर्थ पावसाळा. यात कोकणच्या विशिष्ट प्रदेशाचे चित्र गडद रंगात आले आहे. या कादंबरीतील निसर्गवर्णने इतकी रेखीव आणि दृकप्रत्यय देणारी आहेत की वाचक त्यातच गुंग होऊन जातो. मुख्य म्हणजे निसर्ग आणि माणूस यांच्या नात्यातील अर्थपूर्णतेचा प्रत्यय त्यात येतो. यातून पर्यावरण व मानव यांची वीण घट्ट होते. डॉ.अ.ना. देशपांडे म्हणतात, ''त्यांची प्रतिभा ही वन्य प्रदेशात मनःपूर्वक विहार करण्यात रममाण होणारी एक रमणीय निसर्गकन्या आहे.''3 या कादंबरीचा प्रभाव इतका होता की पुढील दहाबारा वर्षे 'पाणकळा' सदृश कादंबरीची निर्मिती वेगाने होऊ लागली.

'सराई' या कादंबरीने 'पाणकळा' पेक्षाही अधिक यश मिळवले. या कादंबरीतील माणसांचे तेथल्या मातीशी असलेले नाते सहज जाणवते. त्यांनी केलेल्या मुसळधार पावसाचे वर्णन तर अनुपमेय आहे. ही सगळी निसर्गवर्णने अतिसमर्पक व अतिसमृद्ध अशा भाषाशैलीतून साकार झाली आहेत. त्यामुळे वर्णनाचे प्रत्ययकारित्व निःसंशय पुष्कळ पटींनी वृद्धिंगत झालेले आहे. निसर्गवर्णनाचा सर्वात अभिनंदनीय विशेष हा की, ती वर्णने त्यांच्या कादंबरीतून चित्रित केलेल्या मानवी जीवनाशी पूर्णपणे सुसंवादी आहेत. पर्यावरणीय दृष्टीने ह्या कादंबऱ्या लक्षणीय वाटतात.

**श्री.ना. पेंडसे :**

एल्गार, हत्या, कलंदर, गारंबीचा बापू, हद्दपार, लव्हाळी, ऑक्टोपस व तुंबाडचे खोत अशी श्री. ना. पेंडसे यांची कादंबरी संपदा आहे. पेंडसे यांनी आपल्या कादंबऱ्यांसाठी हर्णेचा परिसर निवडला तो केवळ 'टूम' म्हणून नव्हे तर या विशिष्ट भूप्रदेशातील जीवननाट्या त्यांनी समर्थपणे चित्रित केले आहे. त्या प्रदेशातील माणसे, त्यांचे भलेबुरे व आडवे उभे नाट्यामय आयुष्य, त्या प्रदेशातला निसर्ग आणि त्याचा माणसांशी असलेला निकटचा संबंध हे सारे त्यांना जाणवले, भावले आणि त्याला कृत्रिम रूप न देता ते त्यांनी अस्सल रूपात प्रस्तुत केले. एकूण पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मानवी जीवनावर संकटे ओढवून घेणे होय. अषा जीवनातील नाट्य मांडताना निवेदनात तटस्थ तरीही चैतन्ययुक्त, जिवंत व जीवनवेधी शैलीतून त्यांनी या जीवननाट्याचे दर्शन घडवले आहे. लेखक म्हणतात की 'एकप्रकारच्या बेहोषीत हे लेखन मी केले' आणि त्यांची बेहोशी वाचकापर्यंत नेण्यात त्यांना यश लाभले आहे.

Scanned with OKEN Scanner

एल्गार या कादंबरीमध्ये पाकिस्तानच्या निर्मितीमुळे हिंदू–मुसलमान यांच्यात जातीय तणाव आहे. वास्तविक तत्पूर्वी ब्राम्हण रघूव मुसलमान कादर यांच्यात जिवाभावाची मैत्री असते पण आता त्यांच्यातही तणाव निर्माण झालेला आहे आणि त्यांच्या समज–अपसमजाची वादळे उठू लागली आहेत. या कादंबरीला हर्णे परिसरातील साखरपेंडी या छोट्या निसर्गरम्य गावाची पार्श्वभूमी लाभली आहे.

हत्या व कलंदर ह्या परस्परसंबंधी कादंबऱ्या आहेत. 'हत्या'मध्ये बालपणापासून ते पौगंड अवस्थेपर्यंतचे हनुमंताच्या जीवनाचे चित्रण रेखाटले आहे. येथे तो बागेत, शेतात, गुरात वावरणारा हन्न्या असतो. 'कलंदर' मध्ये त्याची भेट मोतीरामशी होते. या दोन्ही कादंबऱ्या मिळून लेखकाने अनेक नाट्यामय व हृद्य प्रसंग उभे केले आहेत. या दोन्ही कादंबऱ्यांना खेडूत वातावरण व निसर्ग यांची पार्श्वभूमी लाभली आहे.

गारंबीचा बापू या कादंबरीने श्री. ना. पेंडसे यांना श्रेष्ठ कादंबरीकार बनवले. अफाट यश मिळवून दिले आणि मराठी साहित्यात त्यांचे स्थान निश्चित केले. "अफाट बापू आणि सुंदर राधा यांच्या प्रेमाची ही आकर्षक, नेटकी आणि नाट्यगुणांनी युक्त कहाणी. व्यभिचारी आई, भित्रा दिनकर, ढोंगी व कावेबाज अण्णा खोत, प्रेमळ मावशी अशा माणसांच्या सहवासात आणि निसर्गसुंदर गारंबीच्या नितांत रमणीय पार्श्वभूमीवर ही कथा फुलत जाते."4 गारंबीतले लोक परंपरावादी आहेत, परिवर्तनशील नाहीत. ती सोयीस्कर व्यवहार बघणारी आहेत. हे सारे गावकरी आणि धाडसी बापू यांच्यातल्या संबंधाचे, विरोधाचे संघर्षाचे चित्रण यात आहे कारण बापू सरळ आहे, अफाट आहे, जिद्दी आहे, उमेदीचा प्रचंड आहे. राधेची उत्कटता, आतुरता, मोकळेपणा, त्याला मोहरून टाकते. त्याच्या पडत्या काळात त्याला उभारी देते. अण्णा खोताबद्दल त्याला एका बाजूला चीड आहे आणि दुसऱ्या बाजुला दुबळ्या बापाबद्दल विलक्षण अनुकंपा आहे. "बापूच्या आयुष्यातले सगळे चढउतार, मानापमान, यशापयश, जवळीक, दुरावा लेखकाने इथे उभे केल्यामुळे या कादंबरीला लोकप्रियता इतकी लाभली की आपले हे यश पेंडसेंना त्यांच्या पुढच्या कादंबऱ्यातून, रथचक्रसारख्या समर्थ कलाकृतीतून, ओलांडता आले नाही असे म्हटले जाते. एका धडाकेबाज सरळ शैलीत हे लेखन केल्यामुळे ते वाचकांपर्यंतही तितक्या उत्कटतेने पोचू शकले आहे." या कादंबरीच्या यशाच्या वाट्यात पर्यावरण व निसर्ग वर्णनाचा मोलाचे स्थान आहे हे विसरता येत नाही.

हद्दपार ही कादंबरी बुरोंडी–दुर्गेश्वर या परिसरातील आहे. राजेमास्तर हे या कादंबरीचे नायक आहे. कादंबरी बटबटीत आहे पण निसर्गवर्णन लोभस आहे. रथचक्र या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. या कादंबरीत पेंडसे एका जिद्दी स्त्रीच्या अखंड दुर्दैवाची कहणी सांगतात. तिचं जीवन म्हणजे एक मृगजळ आहे. व्यक्तिरेखा अशीच आहेत आणि सूक्ष्मही आहेत. त्यांना निसर्ग पर्यावरणाचा आधार आहे.

**गो.नी. दांडेकर :**

गो.नी. दांडेकरांनी एकूण तेरा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यापैकी पडघवली, माचीवरचा बुधा आणि पवनाकाठचा धोंडी, शिनू ह्या चार कादंबऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या आहेत.

Scanned with OKEN Scanner

पडघवली या गों.नी. दांडेकर यांच्या कादंबरीतून डोंगरदऱ्या, झाडेझुडुपे, कडे कपारी, तळी, नद्या इत्यादींनी निर्माण झालेला सुंदर निसर्ग अवतरला आहे. त्यांना निसर्गातल्या उत्कटतेची आणि भव्यतेची ओढ आहे. त्यांना निसर्गातल्या विविध आणि विस्मयकारी अनुभवात मनःपूर्वक रस आहे. याचा प्रत्यय त्यांच्या पडघवली या कादंबरीतून येतो. माचीवरला बुधा ह्या कादंबरीत बुधा ज्या भागाशी मनाने एकरूप झाला होता त्या भागातल्या सुंदर निसर्गाचे दर्शन घडते. माणूस आणि निसर्ग यांच्या अतूट संबंधावरची श्रद्धा या कादंबरीतून व्यक्त करण्यात आली आहे.

गों.नी. दांडेकर यांच्या पवनाठचा धोंडी या कादंबरीमध्ये धोंडी हा आपले स्वत्व, संस्कार, श्रद्धा उत्कटतेने जपून ठेवतो. पवनाकाठच्या निसर्ग सौंदर्यामुळे त्याला बळ प्राप्त झाले आहे. शितू या कादंबरीतून खेडवळ वातावरणातल्या भोळ्याभाबड्या, उत्कट, प्रेमळ आणि सत्त्वसंपन्न शितूचे भावनाट्य प्रस्तुत केले आहे. तिला निसर्गाची साथ आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या बनगरवाडी या कादंबरीमध्ये एक मास्तर बंद पडलेली शाळा चालवण्यासाठी बनगरवाडीला येतो. तिथला निसर्ग ओसाड आहे आणि माणसंही तितकीच राबलेली ओसाड आहेत. ओसाड निसर्गाच्या पार्श्वभूमीवर लोकजीवनाचे अपूर्व दर्शन यात घडते. 'वावटळू', 'करुणाक', 'सत्तांतर', 'कोवळे दिवस' या चारही कादंबऱ्यातून लोकजीवन आणि निसर्ग यांचा अतूट संबंध त्यांनी चित्रित केला आहे.

**ग्रामीण कादंबऱ्या :**

ग्रामीण कादंबऱ्या प्रादेशिक कादंबऱ्याहून वेगळ्या असल्या तरी त्यांचे निसर्गाशी नाते प्रादेशिक कादंबरीएवढेच जुळलेले असते. बा.भ. बोरकर यांची 'भावीण' व सुभाष भेंडे यांची जोगीण या कादंबऱ्यांना गोव्याची पार्श्वभूमी लाभली आहे. उद्धव शेळके यांची धग व मनोहर तल्हार यांची माणूस यांना वऱ्हाडची पार्श्वभूमी आहे. शंकर पाटील, राजन गवस, रणजित देसाई, रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यातून प्रत्ययकारी निसर्गचित्रण आले आहे. हमीद दलवाई यांच्या इंधन कादंबरीला चिपळून भागाची पार्श्वभूमी आहे. रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा' व आनंद यादव यांची 'गोतावळा' निसर्ग वर्णन समृद्ध आहेत.

पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मानवी जीवनावर संकट ओढवून घेणे होय, अशी धारणा प्रादेशिक कादंबरीतील पर्यावरण जाणीव जागरूकतेत दिसून येते. पर्यावरण समजून घ्यायचे असेल तर त्याचे नियम व सरकारचे कायदे, धोरण समजून घेणे आवष्यक आहे तसेच मराठी साहित्यातील विषेषतः कादंबऱ्यामध्ये आलेले पर्यावरण, भाषाशैली, जनजीवन जाणून घ्यावे लागते. पर्यावरणाची जाणीव असणाऱ्यांना विषेषतः मराठी प्रादेषिक कादंबरीने मराठी साहित्यिकांना करून दिली आहे.

**संदर्भ टिपा :**

1. डॉ. रेखा जगनाळे – प्रादेशिक ग्रामीण साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर i`- 6

Scanned with OKEN Scanner

2. व्यंकटेश चौधरी – पर्यावरण संरक्षण आणि सुखी जनजीवन पर्यावरण शिक्षण केंद्र, एकुर्ला रोड, जि. नाशिक. पृ. 6

3. डॉ. अ.ना. देशपांडे– आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहास भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण – 1979 i`- 173

4. अ. अ. कुळकर्णी (संपा.)– प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे 1991 i`- 109

Scanned with OKEN Scanner